सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**वन विभाग**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांचे कार्यालय

दुरध्वनी क्रमांक (07172) 251414 मुल रोड, चंद्रपुर-442401
ई-मेल ccffdtadoba2@mahaforest.gov.in/ ccf_fdtatr@rediffmail.com

क्रमांक:कक्ष-४/लले/२०२१-२२/**२३५२** चंद्रपूर, दिनांक **०४/०१/२०२२**

**विषय :-** ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील निसर्ग पर्यटन / सफारीबाबत कोव्हीड -१९ च्या अनुषंगाने उपाययोजना.

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दिनांक २७/११/२०२१

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाकरीता निसर्ग पर्यटन, कोव्हीड -१९ चे अनुषंगाने देण्यात आलेले सर्व मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून दिनांक ०१/१०/२०२१ पासून सुरु करण्यात आलेले होते. तद्नंतर वेळोवेळी राज्य शासन व जिल्हा प्रशासन यांचेकडुन देण्यात आलेल्या कोव्हीड -१९ प्रतिबंधात्मक सुचनांचे अनुषंगाने सर्व उपाययोजना करुन पर्यटन आजतागायत सुरळीत सुरु आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात कोर व बफर क्षेत्रात जिप्सी वाहन, कॅन्टर व मिनीबस या वाहनाने पर्यटन करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

तथापि, उपरोक्त संदर्भिय आदेशाच्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांस अनुसरून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील निसर्ग पर्यटना करीता खालीलप्रमाणे अतिरिक्त उपाययोजना करण्यात येत आहे.

१. कोव्हीड-१९ या विषाणूचा वाढता प्रसार लक्षात घेता पर्यटक, मार्गदर्शक, जिप्सीवाहक, निसर्ग मार्गदर्शक, गेट मॅनेजर व कर्मचारी या सर्वांनी संपूर्ण लसीकरण केलेले असावे. अन्यथा व्याघ्र प्रकल्पात पर्यटनासाठी प्रवेश दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. संपूर्ण लसीकरण झालेली व्यक्ती याचा अर्थ खालीलप्रमाणे राहील:-

- लसीच्या दोन्हीही मात्रा (डोस) घेतलेल्या आहेत आणि दुसरी मात्रा (डोस) घेतल्यानंतर १४ दिवस झालेले आहेत अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ; किंवा
- ज्या व्यक्तीची वैद्यकीय स्थिती अशी आहे की, ज्यामुळे त्याला किंवा तिला लस घेण्यास मुभा नाही आणि त्या व्यक्तीकडे तशा अर्थाचे मान्यताप्राप्त डॉक्टराकडील प्रमाणपत्र आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ; किंवा
- १५ वर्षापेक्षा कमी वयाची व्यक्ती, असा आहे.

२. एकाच कुटूंबातील किंवा सोबत प्रवास करणारे / सोबत राहणारे पर्यटकांना प्रचलित नियमानुसार (६ पर्यटक प्रती जिप्सी वाहन) सफारी करता येईल. इतरांसाठी ४ पर्यटक प्रती जिप्सी वाहन यानुसार मर्यादेत सफारी करता येईल.

३. कोर क्षेत्रातील पर्यटन हे मंगळवार व बफर क्षेत्रातील पर्यटन हे बुधवार या दिवशी पूर्वीपासूनच बंद ठेवण्यात आलेले आहे.

४. सर्व प्रवेशद्वारांवर Social distancing कटाक्षाने पाळण्यात यावे.

५. पर्यटन प्रवेशद्वारांवर गर्दी होऊ नये, याकरीता दोन वाहनांमध्ये किमान १५ फुट अंतर ठेवण्यात यावे. शिवाय पर्यटकांना प्रवेश देतांना वाहनांना प्रचलित वेळेच्या अर्धा तास आधी प्रवेश व अर्धा तास आधी बाहेर निघण्याची मुभा राहील. त्यानुसार प्रवेशाकरीता Slots ची आखणी करण्यात येईल. जेणेकरुन, प्रवेशद्वारावर कोणत्याही

प्रकारे गर्दी होणार नाही. तसेच प्रवेशद्वारासमोर जिप्सी वाहनाकरीता रोडवर खुणा (Marking) करण्यात येईल.

६. प्रवेशद्वारातून पर्यटकास प्रवेश देण्यापूर्वी सर्व पर्यटक, जिप्सी चालक, मार्गदर्शक यांचे शरीराचे तापमान हे थर्मल स्कॅनर / ईन्फ्रारेड थर्मामीटरने तपासण्यात येईल. हे सर्वसाधारण असल्यासच प्रवेश देण्यात येईल. ताप-सर्दी-खोकला असलेल्या, आजारी असलेल्या कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच अशी लक्षणे असलेल्या व्यक्तींची माहिती नजीकच्या कोव्हीड रुग्णालयात दिली जाईल.

७. प्रत्येकानी चेहऱ्यावर मास्क लावणे आवश्यक राहील व सोबत रुमाल ठेवणे आवश्यक राहील, मास्कशिवाय प्रवेशद्वारातून प्रवेश दिल्या जाणार नाही. मास्क सोबत घेऊन येण्याची जबाबदारी ही संबंधित वनकर्मचारी, पर्यटक, जिप्सी चालक व मार्गदर्शक यांची राहील.

८. कोणत्याही परिस्थितीत वापरलेला मास्क, हातमोजे, फेस शिल्ड पाण्याच्या बॉटल्या, ईत्यादी साहित्य वनक्षेत्रात अथवा अन्यत्र फेकले जाणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९. पर्यटन वाहनात बसण्यापूर्वी सर्वांनी सॅनिटायझरने हात निर्जंतुक करणे बंधनकारक असेल. त्याशिवाय कोणालाही जिप्सीमध्ये बसू दिले जाणार नाही / प्रवेश दिला जाणार नाही.

१०. प्रवेशद्वारावर येण्यापूर्वी जिप्सीधारकांनी त्यांच्या जिप्सीमध्ये बसणाऱ्यांसाठी सॅनिटायझर ठेवणे बंधनकारक आहे. तसेच जिप्सीधारकांनी जिप्सीची प्रवेशद्वारावर येण्यापूर्वी जिप्सीची साफसफाई व निर्जंतुकीरण करणे आवश्यक राहील.

११. पर्यटकांसाठी स्वच्छतागृहे स्वच्छ ठेवण्यात येतील. प्रत्येक वापरानंतर स्वच्छतागृहे निर्जंतुकीरण करण्यात येईल.

१२. पर्यटन प्रवेशद्वारावर जिप्सीचे चाके निर्जुंतीकरण करण्याची सुविधा असणार असून तसे करणे बंधनकारक राहील.

१३. भ्रमंतीदरम्यान कोणालाही कोणत्याही कारणास्तव वाहनातून खाली उतरता येणार नाही.

१४. विनामास्क कोणालाही प्रवेश देण्यात येणार नाही. सफारीदरम्यान सुध्दा मास्क घालणे बंधनकारक राहील. उल्लंघन करणाऱ्यांना रुपये १०००/- दंड आकारण्यात येईल.

१५. सफारी दरम्यान व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रात सुध्दा वाहनांची गर्दी रोखण्यात यावी, उल्लंघन केल्यास संबंधित जिप्सीचालक तसेच पर्यटकांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. सफारीनंतर पर्यटक/मार्गदर्शक यांनी प्रवेशद्वारावर थांबून गर्दी करणे प्रतिबंधित राहील व तसे आढळल्यास कारवाई करण्यात येईल.

उपसंचालक (कोर/बफर) यांना कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे उपाययोजना या आदेशाद्वारे तात्काळ अंमलात आणण्यात येत आहे. कोव्हीड-१९ संदर्भात उपाययोजना लागू करण्यासाठी सर्व साहित्य (उदाहरणार्थ मास्क, थर्मल स्कॅनर, PPE kits, Disinfectant, इत्यादी) पर्यटन प्रवेशद्वारावर उपलब्ध करुन देण्यात यावे. याकरीता निधीची आवश्यकता असल्यास या कार्यालयास त्वरीत मागणी करावी.

सदरहू उपाययोजना करण्यामध्ये कसूर आढळल्यास संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल. पर्यटक, रिसोर्टधारक, जिप्सीमालक/वाहक, मार्गदर्शक, निसर्ग मार्गदर्शक, गेट मॅनेजर आणि कर्मचारी यांना सदर सुचना कळविण्याबाबत प्रसिध्दीसाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

**स्वा/-**
**(डॉ.जितेंद्र एस.रामगावकर,भा.व.से.)**
**वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक,**
**ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर**

**प्रति,**

उपसंचालक (कोर/बफर)
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर

**प्रतिलिपी :-** प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य यांना माहितीस सादर.
**प्रतिलिपी :-** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर यांना माहितीस सादर.
**प्रतिलिपी :-** जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना माहितीस सस्नेह अग्रेषित.